स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# समग्र शिक्षा, जिल्हा परिषद नाशिक

ssanashik1@gmail.com

विकास प्रेरणा

जा.क्र.सशि/सकाअ-१/७८४/२०२४-२५.  नाशिक,दिनांक :- ८/११/२०२४.
8/11/2024

प्रती,

गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती ( सर्व )

**विषय : जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या इयत्ता ५ वी ते ८ वीचा वर्ग असलेल्या शाळांमधील मुख्याध्यापक, व १ शिक्षकाचे तालुकास्तरीय आनापान साधना कार्यशाळा पूर्ण करणेबाबत.**

**संदर्भ : १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र.संकीर्ण 2011(296/11)/माशि-3 दि.27/01/2012.**

**२) मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्र.शिक्षण आयुक्त/विप.स.2020-21/43, दि.8/12/2020.**

**3) दि.29/10/2024 रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या सूचना व श्री.श्रीरंग सारडा यांचेशी झालेली चर्चा.**

उपरोक्त संदर्भ क्रं.१ ते २अन्वये विपश्यना रिसर्च इन्स्टीटयूट,धम्मगीरी, इगतपूरी जिल्हा नाशिक या संस्थेमार्फत विविध कालावधीच्या निवासी विपश्यना शिबीराचे आयोजन संस्थेच्या स्थानिक केंद्रांमध्ये केले जाते. आनापान / विपश्यना साधना पध्दती ही विपश्यना साधना शिकण्याची पहिली पायरी आहे. बालपणी व पौगंडावस्थेत वाटणारी परीक्षेची चिंता, काळजी व ताणतणाव मुले आनापान साधनेव्दारे अत्यंत आत्मविश्वासाने हाताळू शकतात याव्दारे स्वतःच्या अंतर्मनामध्ये डोकावून, विचारांना सकारात्मक बनवून, आत्मविश्वास जागृत करुन स्वतःच्या आचार व विचारांवर प्रभुत्व मिळविणे मुलांना शक्य होते. हे प्रशिक्षण ३ टप्प्यांमध्ये देण्यात येते.

**टप्पा क्र.१-** विदयार्थी हिंसा,चोरी, खोटे बोलणे, लैंगिक दुर्व्यवहार व मादक पदार्थांचे सेवन इत्यादीपासून दूर राहण्यासाठी प्रयत्नशिल राहतात हा साधनेचा मुल आधार आहे. या आचरणामुळे विदयार्थी स्वंयशासनाव्दारे स्वतःच्या अनियमित मनावर नियंत्रण मिळविण्यात यशस्वी होतात.

**टप्पा क्र.२-** मुले आनापान क्रियेव्दारे श्वासोच्छवासावर लक्ष केंद्रीत करतात, या व्दारे श्वासाची आत घेण्याची व बाहेर जाण्याची नैसर्गिक क्रीया ते पुर्ण एकाग्रतेने अनुभवतात.

**टप्पा क्र.३-** आनापान क्रियेव्दारे अनुभवलेली मनःशांती व आत्मानंद इतरांमध्ये प्रसारीत करण्यासाठी मेत्ताभावना (मैत्री भावना /सर्वांचे मंगल व्हावे ही प्रेरणा )अनुभवतात.

आनापान/ विपश्यना साधनांच्या दैनंदिन सरावामुळे मुलांमध्ये एकाग्रता वाढते, जागृतता व सतर्कता वाढते, स्वयंशासन वृध्दींगत होते, स्मरणशक्ती वाढते, निर्णय क्षमता वाढते, आत्मविश्वास वृध्दींगत होतो. भिती, राग, चिड, उदासिनता कमी होते. कार्यक्षमता वाढते, अभ्यास, खेळ व अन्य अभ्यासेत्तर उपक्रमामध्ये सहभाग वाढतो असे निदर्शनास आलेले आहे. या साधना पध्दतीमध्ये कोणतेही धार्मिक व कर्मकांड अंतर्भूत नसल्याने तिचे आचरण एका सुदृढ मानसिकतेच्या पिढीच्या निर्मितीसाठी अत्यावश्यक आहे.

संदर्भ क्र.३ अन्वये झालेल्या चर्चेनुसार नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या इयत्ता ५ वी ते ८ वीचा वर्ग असलल्या शाळांमध्य आनापान साधना पध्दती राबविण्याकरीता पुढीलप्रमाणे गटनिहाय इयत्ता ५ वी ते ८ वीचा वर्ग असलेल्या जि.प.शाळांमधील प्रत्येकी मुख्याध्यापक व एक शिक्षक असे दोघांचे तालुकास्तरीय आनापान साधना कार्यशाळा (मित्र उपक्रमांतर्गत मोफत ) आयोजित करण्याचे नियोजन केलेले आहे.

| दिनांक | गटाचे नाव | सहभागी शाळा संख्या | सहभागी प्रशिक्षणार्थी संख्या | दिनांक | गटाचे नाव | सहभागी शाळा संख्या | सहभागी प्रशिक्षणार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २६/११/२०२४ (एकत्रित) | बागलाण | १८/ | ३६ | | | | |
| | देवळा | २२ | ४४ | | | | |
| २७/११/२०२४ | सिन्नर | २९ | ५८ | | | | |
| २८/११/२०२४ | नाशिक | ४२ | ८४ | | | | |
| २९/११/२०२४ | पेठ | ६३ | १२६ | | | | |
| ३०/११/२०२४ | इगतपूरी | ६५ | १३० | | | | |
| ०२/१२/२०२४ | कळवण | ३२ | ६४ | ०२/१२/२०२४ | दिंडोरी | ६५ | १३० |
| ०३/१२/२०२४ | चांदवड | ३६ | ७२ | ०३/१२/२०२४ | मालेगाव | ६१ | १२२ |
| ०४/१२/२०२४ | निफाड | ५४ | १०८ | ०४/१२/२०२४ | नांदगाव | ३५ | ७० |
| ०५/१२/२०२४ | येवला | ५९ | ११८ | ०५/१२/२०२४ | सुरगाणा | ६१ | १२२ |
| ०६/१२/२०२४ | त्र्यंबक | १३२ | २६४ | ०६/१२/२०२४ | | | |

वरील नियोजनाप्रमाणे गटशिक्षणाधिकारी यांनी तालुकास्तरावर कार्यशाळा घेण्याकरीता पुढीलप्रमाणे सुचनांनुसार कार्यवाही

Scanned with OKEN Scanner

करावी.

- जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या इयत्ता ५ वी ते इ.८ वीचा वर्ग असलेल्या प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापक व एक शिक्षक अशा दोघांचे सदर प्रशिक्षण पुर्ण होणे अनिवार्य आहे. तक्त्यात नमूद शाळा संख्येत बदल होण्याची शक्यता गृहीत धरलेली असून आपल्या तालुक्यातील जि.प.व्यवस्थापनाच्या इयत्ता ५ वी ते इ.८ वीचा वर्ग असलेल्या प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापक व एक शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याकरीता आपल्यास्तरावर संख्येत बदल करण्यास हरकत नाही.
- सदर प्रशिक्षणासाठी एक विस्तार अधिकारी (शिक्षण) यांना संपर्क अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात यावी.
- तालुकास्तरीय आनापान कार्यशाळेत इयत्ता ५ वी ते इ.८ वीचा वर्ग असलेल्या प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापक व एक शिक्षक यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. मुख्याध्यापका ऐवजी दुस-या शिक्षकास पाठवू नये.
- सदर कार्यशाळेस तज्ञमार्गदर्शक मित्र उपक्रम यांचेकडून उपलब्ध करुन दिले जातील, सदर तज्ञमार्गदर्शकांचा प्रवास व दैनिक भत्ता खर्च मित्र संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.
- तालुकास्तरीय आनापान शिबीरानंतर प्रशिक्षण घेतलेल्या मुख्याध्यापक व शिक्षकांनी शालेय परिपाठात सदर आनापान साधनेचा समावेश नियमितपणे करुन आनापान साधना नियमित करावयाची आहे./
- सदर प्रशिक्षणात सहभागी होणा-या मुख्याध्यापक व शिक्षकांची यादी पुढील नमुन्यात या कार्यालयास दि.१८/११/२०२४ पावेतो सादर करावी. तसेच सदर प्रशिक्षणाचे संपर्क अधिका-याचे नाव या कार्यालयास कळवावे.

| | शाळेचे नाव | युडायस नंबर | मुख्याध्यापकाचे नाव | मोबाईल नंबर | शिक्षकाचे नाव | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|

वरील नियोजनाप्रमाणे नाशिक जिल्हयातील सर्व तालुक्यांतील जिल्हा परिषद व्यवस्थापनाच्या इयत्ता ५ वी ते इ.८ वीचा वर्ग असलेल्या प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापक व एक शिक्षक अशा दोघांचे एक दिवशीय आनापान साधना कार्यशाळा मित्र संस्थेमार्फत दिनांक ६/१२/२०२४ पावेतो पुर्ण करण्यात यावे. प्रशिक्षणा संदर्भात नियोजन व इतर बाबतीत **श्री. उल्हास फुलझोले, मित्र उपक्रम कार्यशाळा समन्वयक यांच्याशी संपर्क करावा.** प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर छायाचित्रासह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**संपर्क- श्री. उल्हास फुलझोले, मित्र उपक्रम कार्यशाळा समन्वयक, मो.नंबर ९५२७३९१७७०**

(डॉ. नितीन बच्छाव )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नाशिक

प्रत- माहितीस्तव सविनय सादर.
१) मा.राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई.
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
प्रत- कार्यवाहीस्तव.
१) श्री. उल्हास फुलझोले, मित्र उपक्रम कार्यशाळा समन्वयक

/- यांनी उपरोक्त सुचनांचे अवलोकन करुन नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या इ.५ वी ते ८ वीचा वर्ग असलेल्या प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांचे व एक शिक्षक अशा दोघांचे एक दिवशीय आनापान कार्यशाळा प्रशिक्षण दि.०६/१२/२०२४ पावेतो पुर्ण करण्यासाठी नियोजन करुन नियोजनाची प्रत या कार्यालयास सादर करावी.

Scanned with OKEN Scanner